**कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयः, (महाराष्ट्रम्)**
**रामटेक कार्यालय** – प्रशासकीय भवन, मौदा रोड, रामटेक – 441106, जि.नागपूर

## सुरक्षा सेवा पुरविण्याबाबतची निविदा

विश्वविद्यालयाचे मुख्यालय व विविध कार्यालये येथे सुरक्षा सेवा पुरविण्यासाठी निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदेबाबतचा सविस्तर तपशील **www.sanskrituni.net** या संकेतस्थळावर विनामूल्य उपलब्ध आहे. संकेतस्थळावरून ही माहिती व विहित नमून्यातील आवेदनपत्र पुरवठादाराने उपलब्ध करून घ्यावे.

- विहित नमून्यातील निविदा भरून सादर करण्याची अंतिम तिथी 20.08.2010 दुपारी 03.00 पर्यंत आहे.
- निविदा शुल्क रू. 500/– विहित निविदा अर्जासोबत भरणे अनिवार्य आहे,
- विश्वविद्यालयाने जारी केलेल्या सर्व साधारण अटी व शर्ती निविदा प्रक्रियेसाठी लागू राहतील.

कुलसचिव

# कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

## सुरक्षा सेवा पुरविण्याबाबतची निविदा

1. सुरक्षा सेवा पुरवणा—या संस्थेचे नाव : ____________________

2. कार्यालयीन पत्ता व दूरध्वनि/भ्रमणध्वनी क्र. : ____________________
____________________

3. संस्था चालकाचे नाव, पत्ता व भ्रमणध्वनी क्र. : ____________________
____________________

4. संस्था नोंदणी प्रमाणपत्र क्र. व दिनांक : ____________________

5. मुंबई दुकाने व संस्था नियम, 1961 अन्वये नोंदणी प्रमाणपत्र क्र. व दिनांक : ____________________

6. व्यवसाय कर/सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र क्र. व दिनांक : ____________________

7. ई.एस.आय.ॲक्ट 1948 नुसार नोंदणी प्रमाणपत्र क्र. व दिनांक : ____________________

8. विभागीय भविष्य निर्वाह निधी नोंदणी प्रमाणपत्र क्र. व दिनांक : ____________________

9. महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकर यावरील कर अधिनियम 1975 अन्वये नोंदणी प्रमाणपत्र क्र. व दिनांक : ____________________

10. संस्थेचे टॅन नंबर : ____________________

(अ.क्र. 4 ते 10 संदर्भात छायांकित प्रती जोडाव्यात)

11. अनुभव (पुरेशी जागा नसल्यास स्वतंत्र प्रपत्र जोडावेत)

| अ.क्र. | संस्थेचे नाव | पुरविण्यात येणारे मनुष्यबळ | कराराची मुदत | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

12. सुरक्षा सेवा पुरविणा—या संस्थेने दरमहा आकारणी करावयाच्या सेवाशुल्काचा प्रतिमाह दर —

| अ. क्र. | परिसराचे नाव | प्रतिमाह सुरक्षा रक्षकांचा सेवा पुरविणा—या संस्थेतर्फे विश्वविद्यालयास आकारण्यात येणारा दर (नियमानुसार आवश्यक ती शासकीय कपात या रक्कमेतून करण्यात येईल) |
|---|---|---|
| 1 | विद्यापीठ परिसर, रामटेक —<br>(24 तासाचा एक दिवस याप्रमाणे प्रतिमाह दर.) व प्रतिदिन 3 पाळीत सुरक्षा रक्षक<br>01 सुरक्षा रक्षक (अ) हत्यारी, | रू. |
| | 01 सुरक्षा रक्षक (ब) बिनहत्यारी | रू. |
| 2 | गोपनीय कार्यालय, सीताबर्डी, नागपूर —<br>(24 तासाचा एक दिवस याप्रमाणे प्रतिमाह दर.) व प्रतिदिन 3 पाळीत सुरक्षा रक्षक<br>01 सुरक्षा रक्षक (अ) हत्यारी, | रू. |
| | 01 सुरक्षा रक्षक (ब) बिनहत्यारी | रू. |
| 3 | कस्तुरबा भवन, बजाज नगर, नागपूर —<br>(24 तासाचा एक दिवस याप्रमाणे प्रतिमाह दर.) व प्रतिदिन 3 पाळीत सुरक्षा रक्षक<br>01 सुरक्षा रक्षक (अ) हत्यारी, | रू. |
| | 01 सुरक्षा रक्षक (ब) बिनहत्यारी | रू. |
| 4 | नासुप्र संकुल, सीताबर्डी, नागपूर —<br>(24 तासाचा एक दिवस याप्रमाणे प्रतिमाह दर.) व प्रतिदिन 3 पाळीत सुरक्षा रक्षक<br>01 सुरक्षा रक्षक (अ) हत्यारी, | रू. |
| | 01 सुरक्षा रक्षक (ब) बिनहत्यारी | रू. |

इतर माहिती : ______________________________

(पुरेशी जागा नसल्यास स्वतंत्र प्रपत्र जोडावेत) ______________________________

सेवा पुरविणा—या संस्थेचा शिक्का
व स्वाक्षरी

# // प्रमाणपत्र //

मी खालील सही करणार श्री./श्रीमती ________________________________

संचालक ____________________________________ असे नमूद करतो/करते की, मी क.का.संस्कृत विश्वविद्यालयाच्या जाहिरात क्र. __________ दिनांक _______________ अन्वये सुरक्षा सेवा पुरविण्याची निविदा विहित नमून्यात भरून दाखल करीत आहे. उपरोक्त निविदा अर्जात नमूद केलेली सर्व माहिती आणि पुराव्या दाखल जोडलेली सर्व प्रमाणपत्रे ही माझ्या माहितीप्रमाणे सत्य आणि वास्तव आहेत, अशी मी हमी देत आहे. यात कोणतीही असत्यता नाही, तसे आढळल्यास किंवा सिध्द झाल्यास कोणत्याही स्तरावर माझी निविदा अपात्र ठरविण्यात येईल, याची मला पूर्ण जाणीव आहे.

तसेच पुढे मी असेही नमूद करतो/करते की, उपरोक्त जाहिरातीतील निविदा संबंधी सर्व नियम व अटी मी काळजीपूर्वक वाचलेल्या असून ते माझ्यावर बंधनकारक राहतील. विद्यापीठाच्या निविदा अर्ज पडताळणी समितीने दिलेला निर्णय मला मान्य तसेच माझ्यावर बंधनकारक राहील, याची मला पूर्ण जाणीव आहे.

स्थळ –

दिनांक –

अर्जदाराची स्वाक्षरी व शिक्का

नाव ________________________

# कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

## सुरक्षा सेवा पुरविण्याबाबत निविदा सूचना

विद्यापीठासाठी सुरक्षा सेवा पुरविण्याकरिता प्रथमतः तीन महिने व सेवा समाधानकारक आढळल्यास पुढील दोन वर्षे कालावधीसाठी मुदतवाढीबाबत नोंदणीकृत एजन्सींकडून आवश्यक ती माहिती व कागदपत्रांसह मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. नोंदणीकृत एजन्सीने विद्यापीठाच्या नागपूर व रामटेक येथील विविध कार्यालयास तसेच विद्यापीठामध्ये वेळोवेळी होणारे कार्यक्रम व सभा यांच्या स्थानांवर सुरक्षा व्यवस्था पुरविण्याकरिता आवश्यक मनुष्यबळाच्या अनुसार निविदा भरावी. अधिकची माहिती सुरक्षा अधिकारी, अभियांत्रिकी विभागामार्फत दिली जाईल.

**सर्वसाधारण अटी व शर्ती –**

1. www.sanskrituni.net या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. निविदा संच निविदाधारकांनी त्यांच्या लेटरहेड वर ही निविदा भरून **दि. 20.08.2010** दुपारी 3.00 वाजेपर्यंत विद्यापीठाच्या रामटेक कार्यालयात जमा कराव्यात, शक्यझाल्यास त्याच दिवशी दुपारी 4.00 वाजता निविदा उघडल्या जातील. या संबंधीचे सर्व अधिकार विद्यापीठास राहील. निविदेमध्ये विद्यापीठाच्या नागपूर व रामटेक येथील विविध कार्यालयात सुरक्षा सेवा पुरविण्यासाठी देय असणा–या एकूण मासिक सेवाशुल्काचा उल्लेख प्रपत्र 'अ' मध्ये भरून करावा.
2. रू. 500/– (रूपये पाचशे फक्त) ना परतावा निविदा शुल्काचा कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅंकेचा धनाकर्ष, कुलसचिव, क.का.संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांच्या नावाने काढावा. केवळ धनाकर्षाद्वारेच निविदा शुल्क स्वीकारले जाईल.
3. सदर कामासाठी सरकारी व निमसरकारी कार्यालयामधील वार्षिक रू. 10.00 लक्ष व त्यावरील रकमेची सुरक्षा सेवा पुरविल्याचा किमान 3 वर्षाचा अनुभव असल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच निविदा ग्राह्य धरण्यात येईल.
4. निविदा धारकांनी निविदेसोबत ज्या संस्थामध्ये त्यांच्या एजन्सीमार्फत सुरक्षा सेवा पुरविली जाते अशा संस्थांची यादी व संस्थेबरोबर केलेल्या कराराची छायांकित प्रत जोडावी.
5. दरपत्रक व इतर कागदपत्रे ही दोन स्वतंत्र लिफाफ्यांमध्ये द्यावीत व लिफाफ्यावर तसा स्पष्ट उल्लेख करावा.
6. अटी व शर्ती असलेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाही.
7. निविदा संच पोस्टाने/कुरिअरने दिले अथवा स्वीकारले जाणार नाहीत. हस्तपोच स्वरूपातच निविदा संच रामटेक येथील कार्यालयात स्वीकारल्या जातील.
8. निविदेमध्ये आवश्यक ती सर्व माहिती भरावी व त्या अनुषंगाने लागणारी खालील आवश्यक कागदपत्रे जोडावीत –

   संस्था नोंदणी प्रमाणपत्र, शॉप ॲक्ट लायसेन्स, पीएफ नोंदणी प्रमाणपत्र, ईएसआय

प्रमाणपत्र, मागील तीन वर्षांचे प्राप्तीकर, व्यवसाय कर व सेवा कर भरल्याचे प्रमाणपत्र, कामाच्या अनुभवाची प्रमाणपत्रे/वर्क ऑर्डर्स इत्यादी.

9. सुरक्षा सेवकास शासनाने वेळोवेळी निश्चित केल्याप्रमाणे प्रतिमहिना प्रत्येकी किती किमान वेतन देय राहील, याचा स्पष्ट उल्लेख दरपत्रकात असावा व त्याप्रमाणे सेवकास वेतन देणे बंधनकारक राहील. कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट 1970, मिनिमम वेजेस ॲक्टस 1948, पेमेंट ऑफ ग्रॅज्युटी ॲक्ट 1972, पेमेंट ऑफ बोनस ॲक्ट 1965, विकली हॉलीडे ॲक्ट 1942 व इतर सर्व कामगार विषयक कायद्यांचे पालन करण्याच्या अटींच्या अधीन राहून एकत्रित वेतनाच्या दराचा उल्लेख दरपत्रकात असावा. कर्मचा–यांना देण्यात येणारे वेतन हे मिनिमम वेजेस ॲक्ट अन्वये निर्धारित केलेल्या वेतनापेक्षा कोणत्याही परिस्थितीत कमी नसावे. कामावर एजन्सीमार्फत पुरवठा केलेल्या सर्व कामागारांचा कायदेशीर हक्क, हितसंबंध, मोबदला, नुकसान भरपाई इत्यादींबाबतीत एजन्सी सर्वस्वी जबाबदार राहील व त्याची कोणत्याही प्रकारची जोखीम विद्यापीठावर येणार नाही, असे हमीपत्र एजन्सीने भरून देणे आवश्यक आहे. एजन्सीने सुरक्षा रक्षकांचे ईएसआय व पीएफ अकाउंट व कामगार कायद्यास अनुसरून इतर सर्व कायदेशीर बाबींच्या नोंदी ठेवाव्यात व विद्यापीठाच्या मागणीनुसार सदर नोंदी तपासणीकरिता विद्यापीठास सादर करणे एजन्सीला बंधनकारक राहील. एजन्सीने कायद्यांचे पालन न केल्यास होणा–या सर्व परिणामांची जबाबदारी ही सर्वस्वी एजन्सीचीच राहील. त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. सुरक्षा रक्षकांच्या अपघात प्रसंगी विद्यापीठाकडून कोणतीही वित्तीय व वैद्यकीय मदत एजन्सीला दिली जाणार नाही व अपघात प्रसंगी सुरक्षा रक्षकांना नुकसान भरपाई देण्याची सर्वस्वी जबाबदारी एजन्सीचीच राहील. एजन्सीने त्यांच्या कर्मचा–'यांसाठी जीवन विमा काढणे आवश्यक राहील.

10. विद्यापीठ कर्मचा–यांना देण्यात येणा–या कोणत्याही सोयी, सुविधा एजन्सीमार्फत पुरविण्यात येणा–या कर्मचा–यांना विद्यापीठाद्वारे देय असणार नाहीत.

11. करारातील अटी व शर्ती, करार कालावधी बदलण्याचा अधिकार विद्यापीठाचा राहील.

12. विद्यापीठाने वेळोवेळी सुरक्षेबाबत दिलेल्या आदेशांचे / सूचनांचे पालन करणे एजन्सीवर बंधनकारक राहील.

13. कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा पूर्णतः/अंशतः/विभागून स्वीकारणे, कमी कालावधीसाठी स्वीकारणे, मंजूर करणे अथवा नाकारणे, याबाबतचे सर्व अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेले आहेत.

14. एजन्सी/सुरक्षा कामगारांकडून विद्यापीठाच्या शिस्तीला, मालमत्तेला नुकसान अथवा कोणाच्याही जीवितास धोका पोहोचणार नाही, याची संपूर्ण जबाबदारी एजन्सीची राहील. एजन्सीच्या सुरक्षा रक्षकांकडून विद्यापीठाच्या मालमत्तेचे कळत अथवा नकळत नुकसान झाल्यास अथवा कोणच्याही जीवितास धोका झाल्यास मालमत्तेची दुरूस्ती व नुकसान

भरपाई करून देण्याची अथवा संबंधित व्यक्तीस नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी एजन्सीची राहील व नुकसान भरपाई न दिल्यास नुकसान भरपाईची रक्कम एजन्सीच्या विद्यापीठाकडील अनामत सुरक्षा ठेव अथवा देयकातून कापून घेतली जाईल.

15. कार्यादेश दिल्यानंतर कामागार परवाना काढण्याची जबाबदारी ही सर्वस्वी एजन्सीचीच असेल.
16. निविदेमध्ये विद्यापीठाच्या इमारती व आवाराच्या सुरक्षेकरिता एजन्सीमार्फत पुरविण्यात येणारे सुरक्षा रक्षक व सुरक्षा पर्यवेक्षक यांच्या संख्येबाबत उल्लेख असावा.
17. एजन्सीमार्फत पुरविण्यात येणा—या कर्मचा—यांना विद्यापीठाच्या सेवेत समाविष्ट होण्याचा कोणताही अधिकार राहणार नाही तशी स्पष्ट सूचना एजन्सीमार्फत नेमण्यात येणा—या कर्मचा—यांना देणे एजन्सीला आवश्यक आहे व याबाबत एजन्सीने कर्मचा—यांबरोबर योग्य तो करार करून सुरक्षा कर्मचा—यास कामावर नियुक्त करावे.

**सुरक्षा रक्षक व त्यांच्या कामाचे स्वरूप —**

18. एजन्सीने विद्यापीठास प्रशिक्षित व निरोगी सुरक्षा रक्षक उपलब्ध करून द्यावेत सुरक्षा रक्षकाला सुरक्षा विषयक कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असावा. सुरक्षा रक्षक नेमताना निरोगी माजी सैनिक व होमगार्ड गटातील नाकरिकांना प्राधान्य देण्यात यावे. सुरक्षेसाठी निवडलेल्या कर्मचा—यांचे वय किमान 25 वर्षांच्या दरम्यान असावे. शैक्षणिक पात्रता किमान 10 वी उत्तीर्ण असावी.
19. एजन्सीने विभागातील सुरखा व त्यासंबंधीची इतर सर्व कामे विद्यापीठाच्या वरिष्ठांच्या सूचनेनुसार पार पाडावीत. कामाच्या ठिकाणाबाबत विद्यापीठ पूर्वसूचनेशिवाय बदल करू शकेल व तो बदल एजन्सीवर बंधनकारक राहील. एजन्सीला विद्यापीठातील पर्यवेक्षक/अधिकारी यांच्या सूचनेनुसार काम करावे लागेल. भविष्यामध्ये सुरक्षा रक्षक व सुरक्षा एजन्सी यांच्यामध्ये कोणताही वाद निर्माण झाल्यास त्यांचे वाद न्यायालयामध्ये किंवा न्यायालयाबाहेर मिटवण्याची जबाबदारी सर्वस्वी सुरक्षा एजन्सीचीच राहील. विद्यापीठ कोणताही न्यायालयीन खर्च याकरिता करणार नाही.
20. विद्यापीठाकडून कोणत्याही प्रकारचे गणवेश, साहित्य पुरविले जाणार नाही. सुरक्षा रक्षकांना गणवेश व हिवाळी गणवेश, रेनकोट, गमबुट उपलब्ध करून देण्याची जबाबदारी एजन्सीची राहील. सुरक्षा रक्षकांना गणवेश साहित्यामध्ये टॉर्च, शिटटी, काठी व आवश्यकतेनुसार टॉर्चसाठी सेल देणे एजन्सीवर बंधनकारक राहील. सुरक्षा रक्षकांनी परिधान केलेले गणवेश स्वच्छ व नीटनेटके असावेत. ज्या कर्मचा—यांचे गणवेश स्वच्छ व नीटनेटके नसतील अशा कर्मचा—यांच्या बदल्यात दुसरे कर्मचारी त्वरीत उपलब्ध करून देण्याची व्यवस्था एजन्सीला करावी लागेल.

21. जर एखाद्या कर्मचा–याचे काम समाधानकारक नसेल व तसे विद्यापीठाच्या सक्षम अधिका–याने कळविल्यास संबंधित सुरक्षा कर्मचा–याच्या ऐवजी एजन्सीने दुसरा सुरक्षा कर्मचारी त्वरित नेमावा.
22. विद्यापीठ आवारातील, पाण्याची मोटार व जनरेटर (चालू/बंद) सुरक्षा दिवे सायंकाळी चालू करण्याची व सकाळी बंद करण्याची जबाबदारी एजन्सीचीच राहील तसेच विद्यापीठ आवारातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागांच्या व वाहनांच्या चाव्यांची नोंद व देखभालीची जबाबदारी एजन्सीची राहील.
23. करारादरम्यान विद्यापीठ आवारातील अपघात व आकस्मिक प्रसंगाची माहिती एजन्सीने त्वरित विद्यापीठाच्या कुलसचिवांना द्यावी व या काळात विद्यापीठ प्रतिनिधींनी भ्रमणध्वनी/दूरध्वनी वरून दिलेले आदेश पाळणे एजन्सीवर बंधनकारक राहील.
24. विद्यापीठ आवारातील सिक्युरीटी पॉईट कमी अथवा जास्त करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे व त्यास अनुसरून मनुष्यबळ कमी व जास्त करणे संबंधित एजन्सीवर बंधनकारक राहील व याबाबत सविस्तर लेखी सूचना विद्यापीठामार्फत एजन्सीला वेळोवेळी देण्यात येईल.
25. सुरक्षा व्यवस्थेच्या पर्यवेक्षणाकरिता दहा सुरक्षा रक्षकांपर्यंत किमान एक सुरक्षा पर्यवेक्षक नेमणे एजन्सीवर बंधनकारक राहील.
26. एजन्सीमार्फत रूजू होणा–या सुरक्षा कर्मचा–यांना एजन्सीने ओळखपत्र द्यावे व सुरक्षा कर्मचा–ंयानी सदर ओळखपत्र बाळगावे व मागणी नुसार विद्यापीठ अधिका–यांना दाखवावे.
27. एजन्सीने विद्यापीठ आवारात अनधिकृत व्यक्ती तसेच मोकाट जनावरे संचार करणार नाही याची काळजी घ्यावी.
28. विद्यापीठ आवारात कोणतेही अतिक्रमण होणार नाही याची संपूर्ण काळजी सुरक्षा एजन्सीने घ्यावी.
29. एजन्सीमार्फत पुरविण्यात येणा–या कर्मचा–यांना अग्निशामक उपकरणे हाताळता येणे आवश्यक आहे व याबाबत प्रशिक्षण देण्याची जबाबदारी एजन्सीची राहील.
30. एजन्सीच्या अधिका–यांनी कमीत कमी महिन्यातून दोन वेळा विद्यापीठ आवारास भेट देवून सुरक्षा व्यवस्था सक्षम असल्याची खात्री करावी व तसा लेखी अहवाल विद्यापीठातील संबंधित सुरक्षा अधिका–यांना द्यावा.
31. विद्यापीठ आवारातील मालमत्तेचे व जीविताचे रक्षण करणे हे सुरक्षा एजन्सीचे प्रथम कर्तव्य राहील. सुरक्षा रक्षकांच्या गैरहजेरीमुळे विद्यापीठाच्या मालमत्तेचे व कोणत्याही व्यक्तीच्या जीविताचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी सर्वस्वी एजन्सीचीच राहील. विद्यापीठाच्या लेखी पूर्व संमतीशिवाय एजन्सीने इतर कोणत्याही एजन्सीबरोबर याबाबत दुय्यम करार करू

नये. दुय्यम करार केल्याचे असे निदर्शनास आल्यास एजन्सीचा करार तात्काळ रद्द करण्यात येईल व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

32. कराराअन्वये सुरक्षा एजन्सी आणि विद्यापीठामध्ये कंत्राटाच्या दरम्यान वाद निर्माण झाल्यास तो अधिकृत विद्यापीठ प्रतिनिधी व अधिकृत एजन्सी प्रतिनिधी यांच्या चर्चेद्वारे सोडविण्यात यावा. याबाबत अंतिम निर्णय मा.कुलगुरू घेतील व तो एजन्सीवर व विद्यापीठावर सर्वस्वी बंधनकारक राहील.

33. एजन्सीमार्फत पुरविलेल्या सुरक्षा कर्मचा–यांचे वर्तन शिस्तबध्द असावे व त्यांनी कामावर सतर्क रहावे व कामावर असताना कामाची नेमून दिलेली जागा विना परवानगी सोडू नये. कामाच्या ठिकाणी अनुचित प्रकार घडल्यास कर्मचा–याने त्वरित संबंधित अधिका–यांना लेखी स्वरूपात कळवावे. एजन्सीच्या कर्मचा–यांकडून विद्यापीठाची प्रतिमा अभ्यागतांसमोर डागाळणार नाही याची काळजी एजन्सीने घ्यावी.

34. ज्या एजन्सीचे दरपत्रक स्वीकारले जाईल त्या एजन्सीला सुरक्षेच्या दृष्टीकोनातून किमान तीन महिन्याच्या वेतनाइतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून विद्यापीठाकडे जमा करावी लागेल. करार संपल्यानंतर सदर रक्कम नियमानुसार बिनव्याजी परत करण्यात येईल. ज्या एजन्सीचे दरपत्रक विद्यापीठ स्वीकारील, त्या एजन्सीला विद्यापीठाशी रीतसर करारनामा करावा लागेल. कराराची मुदत कमी अथवा जास्त करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे. याबाबत विद्यापीठ जो निर्णय घेईल तो एजन्सीवर बंधनकारक राहील. संबंधित एजन्सीला विद्यापीठास तीन महिन्याची नोटीस देवून हा करार संपुष्टात आणता येईल. सेवा असमाधानकारक आढळल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता कोणत्याही क्षणी करार संपुष्टात आणण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.

35. एजन्सीमार्फत पुरविण्यात येणा–या सुरक्षा कर्मचा–यांचे वेतन व इतर सुविधा देणे ही सर्वस्वी जबाबदारी एजन्सीची राहील.

36. एजन्सीकडून मिळणा–या सुरक्षा सेवेमध्ये तृटी आढळल्यास व तैनात पहारेकरी संख्या कमी आढळल्यास या बाबत दंड आकारण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.

37. सुरक्षा सेवा ही तीनही पाळीमध्ये द्यावयाची असल्याने कर्मचा–यांना द्यावयाची आठवडी सुट्टी व त्याकरिता रिलीव्हर देणे ही जबाबदारी एजन्सीची राहील व निविदा भरताना याबाबींचा विचार करून निविदा भरण्यात यावी.

38. ग्राह्य निविदाधारकाला नियमानुसार प्राप्तीकर/आयकर सेवा शुल्क व इतर कर भरणे बंधनकारक राहील. दरमहा देण्यात येणा–या देयकातून नियमानुसार टी.डी.एस. ची कपात करण्यात येईल व कपातीबाबत संबंधित एजन्सीला प्रमाणपत्र देण्यात येईल.

39. वरीलप्रमाणे संपूर्ण माहितीसह मोहोरबंद निविदा **कुलसचिव, क.का.संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक** यांच्या नावे **दि. 20.08.2010** रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी रामटेक कार्यालयात स्वीकारल्या जातील. त्यानंतर प्राप्त होणा–या अथवा अपूर्ण निविदांचा विचार केला जाणार नाही. शक्यझाल्यास त्याच दिवशी दुपारी 4.00 वा. निविदा उघडल्या जातील. या संबंधीचे सर्व अधिकार विद्यापीठास राहील.

जाहिरात क्र. ______________

दिनांक __________________ कुलसचिव

**कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयः, (महाराष्ट्रम्)**

**रामटेक कार्यालय** – प्रशासकीय भवन, मौदा रोड, रामटेक – 441106, जि.नागपूर

# सुरक्षा सेवा पुरविण्याबाबतची निविदा

विश्वविद्यालयाचे मुख्यालय व विविध कार्यालये येथे सुरक्षा सेवा पुरविण्यासाठी निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदेबाबतचा सविस्तर तपशील **www.sanskrituni.net** या संकेतस्थळावर विनामूल्य उपलब्ध आहे. संकेतस्थळावरून ही माहिती व विहित नमून्यातील आवेदनपत्र पुरवठादाराने उपलब्ध करून घ्यावे.

- विहित नमून्यातील निविदा भरून सादर करण्याची अंतिम तिथी 20.08.2010 दुपारी 03.00 पर्यंत आहे.
- निविदा शुल्क रू. 500/– विहित निविदा अर्जासोबत पाठविणे अनिवार्य,
- विश्वविद्यालयाने जारी केलेल्या सर्व साधारण अटी व शर्ती निविदा प्रक्रियेसाठी लागू.